गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १३९ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282




### जालना मनपा निवडणूक; लोकशाहीचा आज निर्णायक दिवस

# मतदारांच्या हाती शहराचे कारभारी

**जालना | प्रतिनिधी-** जालना महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी आज दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडत असून शहराच्या राजकीय भवितव्याचा निर्णय आज मतदान यंत्रात बंद होणार आहे. गेल्या चार वर्षांपासून महापौरविना कारभार करणाऱ्या जालना महानगरपालिकेला उद्या नवा चेहरा मिळणार असून संपूर्ण शहराचे लक्ष या निवडणुकीकडे लागून राहिले आहे.

गेल्या पंधरा दिवसांपासून शहरातील वातावरण पूर्णपणे राजकीय झाले होते. भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, महाविकास आघाडी, एमआयएम, वंचित बहुजन आघाडी यांच्यासह अपक्ष उमेदवारांनी प्रचाराची धूम उडवली होती. सकाळपासून रात्री उशिरापर्यंत प्रभागनिहाय बैठका, रोड शो, पदयात्रा, सभा, सोशल मीडियावर प्रचार यामुळे शहरात राजकीय तापमान चांगलेच वाढले होते.

**दिग्गज नेत्यांची मैदानात उतरून प्रचारात उडी** या निवडणुकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले कारण सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील अनेक दिग्गज नेत्यांनी थेट मैदानात उतरून प्रचार केला. भाजपकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री बावनकुळे, माजी खासदार रावसाहेब दानवे, आमदार बबनराव लोणीकर, माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी भाजप उमेदवारांसाठी प्रभागनिहाय सभा घेतल्या. शिवसेनेकडून आमदार अर्जुनराव खोतकर यांनी जोरदार प्रचार करत शिवसेनेचे नगरसेवक निवडून देण्याचे आवाहन केले. राष्ट्रवादी काँग्रेसकडून अरविंद चव्हाण, तर महाविकास आघाडीकडून खासदार डॉ. कल्याण काळे यांनी शहरातील विविध भागांत दौरे करून मतदारांशी संवाद साधला. एमआयएमकडून ओवैसी, इम्तियाज जलील यांनी मुस्लिमबहुल भागात जाहीर सभा घेत आक्रमक भाषणांद्वारे प्रचाराला धार दिली. त्यामुळे संपूर्ण प्रचार कालावधीत आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी, एकमेकांवर टीका, जुन्या मुद्द्यांची उजळणी पाहायला मिळाली.

विकास, पाणी, रस्ते, ड्रेनेज हे प्रमुख मुद्दे या निवडणुकीत शहरातील मूलभूत प्रश्न केंद्रस्थानी होते. पाणीटंचाई, खड्डेमय रस्ते, ड्रेनेज समस्या, कचरा व्यवस्थापन, अतिक्रमण, बेरोजगारी, आरोग्य सुविधा यासह पीआर कार्ड, लाडकी बहिण अशा या सर्व मुद्द्यांवर प्रत्येक पक्षाने आपापली विकासाची स्वप्ने मांडली. आम्हीच विकास करू शकतो, इतरांनी फक्त आश्वासने दिली अशा प्रकारच्या भाषणांतून मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न झाला.

**प्रलोभने, प्रतिष्ठा आणि पैसा - मतदारांची कसोटी** निवडणुकीच्या अखेरच्या टप्प्यात काही ठिकाणी पैसा, भेटवस्तू, पदांचे आमिष दाखवण्याचे प्रकार झाल्याच्या चर्चा शहरात रंगल्या. मात्र प्रशासनाने आचारसंहिता काटेकोरपणे राबवली. भरारी पथकांच्या धाडी, वाहन तपासणी, रोख रकमेवर कारवाई यामुळे प्रचारात काही प्रमाणात मर्यादा आल्या. या पार्श्वभूमीवर नागरिकांसाठी ही निवडणूक एक कसोटी ठरली आहे. कोणत्याही प्रलोभनांना बळी न पडता निर्भयपणे मतदान करण्याचे आवाहन प्रशासन व सामाजिक संघटनांकडून करण्यात आले आहे.

**आज मतदार ठरवणार - प्रभागातून कोण जाणार सभागृहात?** आजच्या मतदान प्रक्रियेत मतदार त्यांच्या प्रभागातून कोणाला महानगरपालिकेत पाठवायचे हे ठरवणार आहेत. शहराचा पुढील पाच वर्षांचा कारभार कोणाच्या हाती जाणार, कोणत्या पक्षाला संधी मिळणार, महापौरपदावर कोण विराजमान होणार - या सर्व प्रश्नांची उत्तरे आजच्या मतदानात दडलेली आहेत. **उद्या लागणार निकाल** मतमोजणी उद्या १६ जानेवारी २०२६ रोजी होणार असून निकालाकडे संपूर्ण जालनेकरांचे लक्ष लागले आहे. कोणता पक्ष सर्वाधिक जागा मिळवतो, कोणाला बहुमत मिळते, आघाडी सरकार स्थापन होते की स्वबळावर सत्ता येते याबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

**चार वर्षांनंतर मिळणार पहिला महापौर** जालना शहराला तब्बल चार वर्षांनंतर महापौर मिळणार आहे. या काळात प्रशासकीय राजवट असल्याने शहर विकासावर मर्यादा आल्याची नागरिकांची भावना आहे. त्यामुळे नव्या महापौराकडून नागरिकांना मोठ्या अपेक्षा आहेत. महापौर पदासाठी आरक्षण अद्याप जाहीर झालेले नसले तरी पुढील चार ते पाच दिवसांत आरक्षण जाहीर होण्याची शक्यता असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. आरक्षण जाहीर झाल्यानंतर महापौरपदाच्या शर्यतीला खऱ्या अर्थाने सुरुवात होणार आहे.

**लोकशाहीसाठी मतदान अत्यावश्यक** या पार्श्वभूमीवर सर्व मतदारांना आवाहन करण्यात येत आहे की, घराबाहेर पडून मतदान करा, निर्भयपणे आपला हक्क बजावा, कोणत्याही दबावाला बळी पडू नका, लोकशाही मजबूत करा. आजचा दिवस जालना शहरासाठी अत्यंत महत्त्वाचा असून मतदारांनी घेतलेला निर्णय पुढील पाच वर्षांचे भविष्य ठरवणार आहे.

संपादकीय पान

# केंद्रीय लोककला युवा महोत्सवात 'जेईएस' महाविद्यालय उपविजेते

## पोवाडा आणि लोकनाट्यात पटकावला प्रथम, तर भारूड अन् लोकगीताला द्वितीय क्रमांक

**जालना | प्रतिनिधी -** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित पहिल्या 'केंद्रीय लोककला युवा महोत्सवात' जालना येथील जेईएस महाविद्यालयाच्या लोककला विभागाने अष्टपैलू सादरीकरण करत उपविजेतेपदाचा बहुमान पटकावला. ६४ महाविद्यालयांच्या चुरशीच्या स्पर्धेत घवघवीत यश संपादन करून या संघाने जालन्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

**पोवाडा आणि लोकनाट्याचा दबदबा**

महोत्सवातील विविध कलाप्रकारांत 'जेईएस'च्या विद्यार्थ्यांनी आपल्या कलेची छाप पाडली. पोवाडा स्पर्धेत विद्यार्थी सोहेब शेख याने प्रा. कल्याण उगले लिखित 'नरवीर तानाजी मालुसरे' यांच्या शौर्यगाथेवर आधारित पोवाड्याचे प्रभावी सादरीकरण केले. त्याच्या या पहाडी सादरीकरणाला प्रथम क्रमांक मिळाला. तसेच, विद्यार्थ्यांनी एकत्रित सादर केलेल्या लोकनाट्यालाही परीक्षकांनी प्रथम क्रमांकाने गौरविले.

लोककलेच्या इतर प्रकारांतही महाविद्यालयाने आपली पकड मजबूत ठेवली. माधवी माळी व आनंद घुले यांनी सादर केलेल्या 'मल्हारीची वारी' या भारुडाला द्वितीय, तर 'गण पूजनाचा सोहळा' या लोकगीतालाही द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. या सर्व यशस्वी सादरीकरणांच्या जोरावर 'जेईएस' महाविद्यालयाचा संघ महोत्सवात 'लोककलेचा उत्कृष्ट संघ' आणि सर्वसाधारण उपविजेता ठरला.

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विजय फुलारी आणि सुप्रसिद्ध लोककला अभ्यासक डॉ. गणेश चंदनशिवे यांच्या शुभहस्ते विजयी संघाला पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. या यशस्वी संघात आनंद घुले, माधवी माळी, आदित्य दुसाने, सोहेब शेख, आर्या वीर, सुमेध वाहुळे व अर्जुन धुमाळ यांचा समावेश होता. त्यांना प्रतीक साळुंके, विशाल उगले, गणेश साळवे व विश्वजीत उगले यांनी वाद्यांची उत्कृष्ट साथ दिली.

या संघाला लोककला विभाग प्रमुख प्रा. शाहीर कल्याण उगले व शाहीर रामानंद उगले यांचे मार्गदर्शन लाभले, तर संघ प्रमुख म्हणून प्रा. मनोज महेर यांनी जबाबदारी सांभाळली. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तम बगडिया, सचिव श्रीनिवास भक्कड, प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, उपप्राचार्य डॉ. महावीर सदावर्ते आणि प्रा. डॉ. यशवंत सोनुने यांनी सर्वांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



# भारतीय लष्कर; परिपक्व व जबाबदार

१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत देश स्वातंत्र्य झाला. देश स्वातंत्र्य करण्यासाठी लाखो ज्ञात - अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले. हजारो, लाखो स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानानंतर मिळालेले हे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याची जबाबदारी भारतीय लष्कराची आहे. भारतीय लष्कराने आपली जबाबदारी इमाने इतबारे पार पाडत देशातील परकीय आक्रमणे रोखून धरली. केवळ रोखून धरलीच नाही तर भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणाऱ्या शत्रू राष्ट्रांना दाती तृण धरायला लावले. भारतीय लष्कराविषयी देशातील १४४ कोटी जनतेला नितांत आदर आहे. भारतीय लष्कराचे भूदल, नौदल व वायुदल हे तीन प्रमुख विभाग आहेत. भूदल अर्थात भारतीय आर्मीचे जवान देशाच्या सीमांचे रक्षण करतात. आज १५ जानेवारी, आजचा दिवस संपूर्ण देशात भारतीय लष्कर दिन अर्थात इंडियन आर्मी डे म्हणून साजरा केला जातो. चला तर मग आजच्या भारतीय लष्कर दिनानिमित्त आपण या लेखातून भारतीय लष्कराची माहिती घेऊ या. भारतीय लष्कराचा मूळ पाया व अंतर्गत गाभा हा ब्रिटिश आर्मीवर आधारलेला आहे. याच ब्रिटिशांकडून १५ जानेवारी १९४९ ला तत्कालीन फील्ड मार्शल के एम करिअप्पा यांनी पदभार स्वीकारला त्यामुळे हा दिवस भारतीय लष्कर दरवर्षी आर्मी डे म्हणून साजरा करते. भारतीय लष्कर ही प्रशंसनीय काम केलेली सन्माननीय संस्था आहे व आंतरराष्ट्रीय पातळीवरही आपल्या लष्कराला मान आहे. भारतीय लष्कराची एक प्रतिमा आहे, ती चांगली आहे. भारतीय लष्कराची नेहमीच प्रशंसा झालेली असून लष्कराने देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय आव्हानांचा सामना करताना आदर्श कामगिरी केली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांती रक्षक सेनेत भारतीय लष्कराची मोठी भुमिका आहे. आंतरराष्ट्रीय समुदायाने भारतीय लष्कराच्या कामाची नेहमीच स्तुती केली आहे. भारतीय लष्कर हे केवळ शक्तिप्रदर्शनासाठी नाही. या संस्थेकडे एक परिपक्वता आणि जबाबदारीही आहे. भारतीय लष्कर हे आज जगातील सर्वात शक्तिशाली लष्कर म्हणून ओळखले जाते. केवळ शत्रू राष्ट्रच नव्हे तर अमेरिका, रशिया, चीन यासारखी बलाढ्य राष्ट्रही भारतीय लष्कराची क्षमता जाणून आहे. देशातील १४४ कोटी जनतेचे रक्षण करण्यास भारतीय लष्कर सक्षम आहे. भारतीय लष्कराच्या सर्व जवानांना लष्कर दिनाच्या अर्थात इंडियन आर्मी डे च्या हार्दिक शुभेच्छा! तसेच देशासाठी शहीद झालेल्या भारतीय लष्कराच्या जवानांना विनम्र अभिवादन!! जय हिंद!!!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# मतदानाची टक्केवारी वाढवणे ही काळाची गरज!

लोकशाहीच्या उत्सवात आपले मत हे केवळ एक शिक्का किंवा बटण नसून, ते आपल्या शहराच्या आणि देशाच्या भविष्याचा पाया आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर 'मतदानाचा टक्का वाढवणे' ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून ते आपले कर्तव्य आहे. लोकशाहीमध्ये 'लोक' हेच सर्वोच्च असतात, पण हे 'लोक' जेव्हा मतदानाच्या दिवशी घराबाहेर पडत नाहीत, तेव्हा लोकशाहीचा आत्मा कमकुवत होतो. अनेकदा आपण रस्ते, पाणी, कचरा आणि विकासाच्या नावाने तक्रारी करतो, पण या समस्या सोडवणारा प्रतिनिधी निवडण्याची संधी येते तेव्हा आपण 'सुट्टीचा आनंद' घेण्यात मग्न असतो.

मत म्हणजे तुमचे भविष्य... तुमचे एक मत हे ठरवते की पुढची पाच वर्षे तुमच्या प्रभागातील आरोग्य व्यवस्था कशी असेल, तुमच्या मुलांना खेळायला बाग मिळेल की नाही किंवा नळाला पाणी वेळेवर येईल का? मतदानाचा टक्का वाढणे म्हणजे 'जागरूक नागरिकत्व' वाढणे होय. जेव्हा १00% मतदान होते, तेव्हा निवडून येणाऱ्या प्रतिनिधीवरही लोकांच्या अपेक्षांचे नैतिक दडपण असते.

'नोटा' पेक्षा 'निवड' महत्त्वाची... अनेकांना वाटते की कोणताही उमेदवार योग्य नाही. परंतु, उपलब्ध पर्यायांपैकी सर्वोत्तम निवडणे किंवा स्वतःचा अधिकार बजावणे हे नकारात्मक राहण्यापेक्षा कधीही चांगले. मतदानाचा टक्का जितका जास्त, तितकी भ्रष्ट आणि अकार्यक्षम प्रवृत्तींना चाप बसण्याची शक्यता जास्त असते.

युवा शक्तीचा सहभाग... छत्रपती संभाजीनगर हे तरुणांचे शहर आहे. हजारो विद्यार्थी इथे शिक्षणासाठी येतात. पहिल्यांदा मतदान करणाऱ्या तरुणांनी मतदानाचा टक्का वाढवण्यात पुढाकार घ्यायला हवा. सोशल मीडियावरील चर्चेपेक्षा प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊन केलेली कृती जास्त प्रभावी ठरते.

बदलाची सुरुवात 'मी' पासून माझ्या एका मताने काय होणार? हा विचारच लोकशाहीला घातक आहे. थेंबे थेंबे तळे साचे, या उक्तीप्रमाणे प्रत्येक मतदाराचे योगदान महत्त्वाचे आहे.

मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी आपण खालील गोष्टी करू शकतो:

आपल्या कुटुंबातील सर्वांना मतदान करण्यासाठी प्रवृत्त करणे.

परिसरातील ज्येष्ठ नागरिकांना मतदान केंद्रापर्यंत पोहोचवण्यास मदत करणे.

मतदान हा 'सुट्टीचा दिवस' न मानता 'कर्तव्याचा दिवस' मानणे. छत्रपती संभाजीनगरला आदर्श शहर बनवण्यासाठी केवळ प्रशासन सक्षम असून चालणार नाही, तर नागरिक म्हणून आपणही सक्रिय व्हायला हवे. १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या मतदानात आपण सर्वांनी सहभागी होऊन मतदानाचा टक्का ९५% च्या पार नेण्याचा संकल्प करूया.

लक्षात ठेवा: जो मतदान करत नाही, त्याला प्रशासनावर टिका करण्याचा नैतिक अधिकार उरत नाही!

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, मतदानाचा हक्क बजावण्यासाठी १५ जानेवारी २०२६ रोजी संपूर्ण छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रात सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. शासकीय आणि निमशासकीय कार्यालये: सर्व राज्य शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, महामंडळे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना ही सुट्टी लागू राहील...

**शेख अब्दुल रहीम,**
**हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन, छ. संभाजीनगर. ९६५७५२४५४५**

# सत्तेपुढे शहाणपण चालते, पण ते निर्भीडपणे मांडावेच लागते: न्यायमूर्ती मोहिते-डेरे यांचा युवा विधीज्ञांना संदेश

**जालना | प्रतिनिधी -** सत्तेपुढे निर्भीडपणे सत्य मांडण्याचे धाडस वकिलांमध्ये असायला हवे. अन्यायाला आव्हान देत, ज्यांचा आवाज दाबला जातो त्यांच्यासाठी खंबीरपणे उभे राहणे हे प्रत्येक वकिलाचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे यांनी केले. मेघालय उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती म्हणून पदभार स्वीकारण्यापूर्वी मुंबई उच्च न्यायालयात आयोजित निरोप समारंभात त्या बोलत होत्या. त्यांच्या या मार्गदर्शनाचे जालना येथील तरुण वकील आणि विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष महत्त्व असल्याचे मत नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धनावत यांनी व्यक्त केले आहे.

गुरुवारी (८ जानेवारी) मुंबई उच्च न्यायालयात आयोजित केलेल्या निरोप समारंभात बोलताना न्यायमूर्ती मोहिते-डेरे यांनी वकील आणि न्यायव्यवस्थेच्या जबाबदारीवर प्रकाश टाकला. केंद्र सरकारने १ जानेवारी रोजी न्यायमूर्ती डेरे यांची मेघालय उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती अधिसूचित केली होती. आपल्या भाषणात त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाचा गौरवशाली वारसा जपण्याचे आवाहन केले. त्या म्हणाल्या, एक वकील म्हणून तुमची संविधानाप्रती मोठी जबाबदारी आहे. तुम्ही न्यायाचे आणि सत्याचे शिलेदार आहात. त्यामुळे निर्भयपणे बोला, अथकपणे युक्तिवाद करा आणि जे योग्य आहे त्याच्या बाजूने खंबीरपणे उभे रहा. तुमची सचोटी आणि धैर्य समाजात कायमस्वरूपी प्रभाव टाकेल. न्याय घडवण्याची शक्ती तुमच्या हातात आहे. केवळ अशिलांचे प्रतिनिधित्व करू नका, तर सामाजिक कारणांसाठी लढा. सत्तेपुढे सत्य बोला, अन्यायाला आव्हान द्या आणि ज्यांचा आवाज दाबला गेला आहे, त्यांच्यासाठी उभे रहा. तुमचा आवाज अत्याचार आणि स्वातंत्र्य यातील अंतर मिटवू शकतो.

यावर प्रतिक्रिया देताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश एस. धनावत म्हणाले की, न्यायमूर्ती मोहिते-डेरे यांचे शब्द हे केवळ मुंबईतील वकिलांसाठीच नव्हे, तर जालना सारख्या निमशहरी भागातील तरुण वकील आणि कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दीपस्तंभासारखे आहेत. त्यांनी आपल्या भाषणातून कायद्याच्या व्यवसायाचे खरे सार सांगितले आहे. केवळ कायद्याची कलमे पाठ करून यशस्वी होता येत नाही, तर त्यासाठी सामाजिक बांधिलकी, सचोटी आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची वृत्ती अंगी बाणवणे आवश्यक आहे. जालना जिल्ह्यातील युवा विधीज्ञांनी आणि विद्यार्थ्यांनी न्यायमूर्तींच्या मार्गदर्शनातून प्रेरणा घ्यावी. त्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, वकिली हे केवळ एक करिअर नसून, समाजातील शेवटच्या घटकाला न्याय मिळवून देण्याचे एक पवित्र कार्य आहे. न्यायमूर्ती मोहिते-डेरे यांनी सांगितल्याप्रमाणे, जेव्हा आपण निर्भीडपणे आणि निष्ठेने काम करतो, तेव्हाच आपण मुंबई उच्च न्यायालयाचा आणि पर्यायाने भारतीय न्यायव्यवस्थेचा गौरवशाली वारसा पुढे नेऊ शकतो. न्यायमूर्ती मोहिते-डेरे यांनी आपल्या भाषणात पुढे सांगितले की, न्यायदान हे केवळ कायद्याचा अर्थ लावण्याचे काम नाही, तर लोकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास दृढ करण्याची एक संधी आहे. पुणे येथे जन्मलेल्या न्यायमूर्ती मोहिते-डेरे यांनी सिम्बायोसिस लॉ कॉलेजमधून कायद्याची पदवी घेतली आणि केंब्रिज विद्यापीठातून एलएल.एम. पूर्ण केले. २१ जून २०१३ रोजी त्यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली आणि २ मार्च २०१६ रोजी त्या न्यायाधीश म्हणून कायम झाल्या. त्यांचा हा प्रवास आणि त्यांचे विचार निश्चितच नवोदित वकिलांसाठी प्रेरणादायी आहेत.

# स्वातंत्र्यच का?

प्रश्न- स्वातंत्र्य, समता आणि न्याय या पैकी एकाची निवड करायची झाल्यास तुम्ही काय निवडाल?*

उत्तर- अर्थात स्वातंत्र्य ! प्रश्न- का?

उत्तर- समता आणि न्याय या पैकी मी काहीही निवडले तर त्यात स्वातंत्र्य मिळेलच असे नाही. पण स्वातंत्र्य निवडले तर त्याच्या रक्षणासाठी समता आणि न्याय आपोआप येतात. समता आली तर स्वातंत्र्य येईलच याची खात्री नसते पण स्वातंत्र्य आले तर समता येतेच येते. न्याय येतेच येते.

प्रश्न- तुमचा भर समतेपेक्षा स्वातंत्र्यावर जास्त आहे का?

उत्तर- होय, आहेच!!! स्वातंत्र्य ही गोष्ट मला कोणत्याही गोष्टीपेक्षा श्रेष्ठ वाटते. समतेचा आग्रह करणाऱ्यांनी स्वातंत्र्याचा संकोच केल्याची अनेक उदाहरणे आहेत. पण स्वातंत्र्याचा आग्रह धरणारे समतेचा विरोध करीत नाहीत. तसेच सेक्युलर लोकांनी देखील स्वातंत्र्यांचा संकोच केल्याचे उदाहरणे आहेत. पण स्वातंत्र्याचे समर्थक कधीच सेक्युलॅरिजमला विरोध करीत नाहीत. जेथे स्वातंत्र्य असते तेथेच सेक्युलॅरिजमची निकोप वाढ होऊ शकते.

प्रश्न- १५ ऑगस्ट १९४७ला देश स्वातंत्र्य झाला. आता स्वातंत्र्याचा विषय कोठे राहिला आहे?

१५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वातंत्र्य झाला हे मर्यादीत अर्थाने खरे आहे.त्या दिवशी इंग्रजचे सरकारी निर्बंधचे कायदे रद्द झाले असते तर आपण पूर्ण अर्थाने स्वातंत्र्य झालो असे म्हणू शकलो असतो. २६ जानेवारी १९५0.ला आपण राज्य घटना स्वीकारली. संविधानाने सर्वांना स्वातंत्र्य दिले यात वाद नाही. पण तरीही ते निर्बंधचे कायदे कायम राहिले. १८ जून १९५१ रोजी पहिली घटनादुरुस्ती करून त्या निर्बंधना घटनात्मक मान्यता देण्यात आली. एका फाटक्या सरशी दशाटील तमाम शेतकरी गुलाम झाले. अनुच्छेद ३१ ए व बी मधील दुरुस्ती आणि परिशिष्ट ९ची निर्मिती ही घटना शेतकऱ्यांना गुलाम बनवणारी ठरली. देश स्वातंत्र्य होने पुरेसे नसते, त्या देशाचे नागरिक स्वातंत्र्य असायला हवेत. गांधीजी हेच सांगत होते.

प्रश्न- स्वातंत्र्य महत्वाचे की संरक्षण?

उत्तर- सर्जकांना (शेतकरी-स्त्री आदी) या दोन्ही गोष्टी लागतात. परंतु आधी स्वातंत्र्य हवे असते. स्वातंत्र्य न देता दिलेले संरक्षण म्हणजे गुलाम करण्याची कपट नीती. आधी स्वातंत्र्य द्या, मग संरक्षण द्या.

प्रश्न- भारतात शेतकऱ्यांना स्वातंत्र्य द्यायचे असेल तर काय करावे लागेल?

उत्तर- ज्या बेडयांनी बांधले आहे, त्या बेड्या सोडणे म्हणजे स्वातंत्र्य देणे होय. भारतातील शेतकऱ्यांना खालील कायद्यांनी गुलाम केले आहे. १) कमाल शेतजमीन धारणा कायदा (सीलिंग) २) आवश्यक वस्तू कायदा ३) जमीन अधिग्रहण कायदा. या कायद्याच्या बेडयांनी शेतकऱ्याला गुलाम केले आहे. ते रद्द करणे ही शेतकरी स्वातंत्र्याची सुरुवात ठरेल. पुन्हा गुलाम करता येणार नाही या साठी अनुच्छेद ३१ ए व बी मधील दुरुस्ती आणि परिशिष्ट ९ रद्द करावें लागतील.

**अमर हबीब, आंबाजोगाई**
**किसानपुत्र आंदोलन मो. ८४११९०९९०९**

# सत्तेपुढे शहाणपण चालते, पण ते निर्भीडपणे मांडावेच लागते: न्यायमूर्ती मोहिते-डेरे यांचा युवा विधीज्ञांना संदेश

**जालना | प्रतिनिधी -** सत्तेपुढे निर्भीडपणे सत्य मांडण्याचे धाडस वकिलांमध्ये असायला हवे. अन्यायाला आव्हान देत, ज्यांचा आवाज दाबला जातो त्यांच्यासाठी खंबीरपणे उभे राहणे हे प्रत्येक वकिलाचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे यांनी केले. मेघालय उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती म्हणून पदभार स्वीकारण्यापूर्वी मुंबई उच्च न्यायालयात आयोजित निरोप समारंभात त्या बोलत होत्या. त्यांच्या या मार्गदर्शनाचे जालना येथील तरुण वकील आणि विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष महत्त्व असल्याचे मत नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धनावत यांनी व्यक्त केले आहे.

गुरुवारी (८ जानेवारी) मुंबई उच्च न्यायालयात आयोजित केलेल्या निरोप समारंभात बोलताना न्यायमूर्ती मोहिते-डेरे यांनी वकील आणि न्यायव्यवस्थेच्या जबाबदारीवर प्रकाश टाकला. केंद्र सरकारने १ जानेवारी रोजी न्यायमूर्ती डेरे यांची मेघालय उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती अधिसूचित केली होती. आपल्या भाषणात त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाचा गौरवशाली वारसा जपण्याचे आवाहन केले. त्या म्हणाल्या, एक वकील म्हणून तुमची संविधानाप्रती मोठी जबाबदारी आहे. तुम्ही न्यायाचे आणि सत्याचे शिलेदार आहात. त्यामुळे निर्भयपणे बोला, अथकपणे युक्तिवाद करा आणि जे योग्य आहे त्याच्या बाजूने खंबीरपणे उभे रहा. तुमची सचोटी आणि धैर्य समाजात कायमस्वरूपी प्रभाव टाकेल. न्याय घडवण्याची शक्ती तुमच्या हातात आहे. केवळ अशिलांचे प्रतिनिधित्व करू नका, तर सामाजिक कारणांसाठी लढा. सत्तेपुढे सत्य बोला, अन्यायाला आव्हान द्या आणि ज्यांचा आवाज दाबला गेला आहे, त्यांच्यासाठी उभे रहा. तुमचा आवाज अत्याचार आणि स्वातंत्र्य यातील अंतर मिटवू शकतो.

यावर प्रतिक्रिया देताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश एस. धनावत म्हणाले की, न्यायमूर्ती मोहिते-डेरे यांचे शब्द हे केवळ मुंबईतील वकिलांसाठीच नव्हे, तर जालना सारख्या निमशहरी भागातील तरुण वकील आणि कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दीपस्तंभासारखे आहेत. त्यांनी आपल्या भाषणातून कायद्याच्या व्यवसायाचे खरे सार सांगितले आहे. केवळ कायद्याची कलमे पाठ करून यशस्वी होता येत नाही, तर त्यासाठी सामाजिक बांधिलकी, सचोटी आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची वृत्ती अंगी बाणवणे आवश्यक आहे. जालना जिल्ह्यातील युवा विधीज्ञांनी आणि विद्यार्थ्यांनी न्यायमूर्तींच्या मार्गदर्शनातून प्रेरणा घ्यावी. त्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, वकिली हे केवळ एक करिअर नसून, समाजातील शेवटच्या घटकाला न्याय मिळवून देण्याचे एक पवित्र कार्य आहे. न्यायमूर्ती मोहिते-डेरे यांनी सांगितल्याप्रमाणे, जेव्हा आपण निर्भीडपणे आणि निष्ठेने काम करतो, तेव्हाच आपण मुंबई उच्च न्यायालयाचा आणि पर्यायाने भारतीय न्यायव्यवस्थेचा गौरवशाली वारसा पुढे नेऊ शकतो. न्यायमूर्ती मोहिते-डेरे यांनी आपल्या भाषणात पुढे सांगितले की, न्यायदान हे केवळ कायद्याचा अर्थ लावण्याचे काम नाही, तर लोकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास दृढ करण्याची एक संधी आहे. पुणे येथे जन्मलेल्या न्यायमूर्ती मोहिते-डेरे यांनी सिम्बायोसिस लॉ कॉलेजमधून कायद्याची पदवी घेतली आणि केंब्रिज विद्यापीठातून एलएल.एम. पूर्ण केले. २१ जून २०१३ रोजी त्यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली आणि २ मार्च २०१६ रोजी त्या न्यायाधीश म्हणून कायम झाल्या. त्यांचा हा प्रवास आणि त्यांचे विचार निश्चितच नवोदित वकिलांसाठी प्रेरणादायी आहेत.

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२६

# जालना शहर महानगरपालिका निवडणूकीच्या मतदानासाठी मतदान केंद्र सज्ज

## २९१ मतदान अधिकाऱ्यांची पथके मतदान केंद्राकडे रवाना

**जालना । प्रतिनिधी -** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने जालना शहर महानगरपालिका निवडणुकीसाठी दि.१५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० या वेळेत मतदान होणार आहे. ही मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी जालना शहर महानगरपालिका २९१ मतदान अधिकाऱ्यांची पथके जिल्हाधिकारी तथा महापालिका आयुक्त आशिमा मित्तल यांच्या उपस्थितीत आज बुधवार, दि.१४ जानेवारी रोजी संबंधीत मतदान केंद्राकडे रवाना झाली असून, जालना शहर महानगरपालिका निवडणुकीसाठी सर्व मतदान केंद्रे सज्ज झाली असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा महापालिका आयुक्त आशिमा मित्तल यांनी दिली.

जालना शहर महानगरपालिकेसाठी दि.१५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होत असून, या मतदान प्रक्रियेसाठी महापालिका निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान केंद्रांवर चोख पोलिस बंदोबस्त राहणार आहे. जालना शहर महानगरपालिका निवडणूकीसाठी २९१ मतदान केंद्रे आहेत.

या ठिकाणी क्षेत्रीय अधिकारी, मतदान पथकांची नियुक्ती करण्यात आली असून, ही पथके देखील आज मतदान केंद्रावर रवाना झाली आहेत. मतदान पथकांसोबत ईव्हीएम यंत्रासह साहित्य, प्रथोमोपचार वैद्यकीय किट, ओआरएस आदी औषधी देण्यात आली आहेत.

जालना शहर महानगरपालिकेची निवडणूक प्रक्रिया शांतता आणि भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी २९१ मतदान केंद्रावर पोलीस कर्मचाऱ्यासह ३६६ केंद्राध्यक्ष, १०९८ मतदान अधिकारी-कर्मचारी यांची नेमणुक करण्यात आली आहे. तसेच २९१ केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर असणार आहे.

मतदान संपल्यानंतर सर्व मतदान पथके सायंकाळी जालना औद्योगिक वसाहतीमधील सिद्धिकी इंजिनियरिंग या ठिकाणी ईव्हीएम मशीन व इतर साहित्य जमा करतील तर स्ट्रॉगरुममध्ये मुख्य निवडणूक निरीक्षक जगदीश मिनियार, जिल्हाधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त आशिमा मित्तल, उमेदवार, प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत सर्व मतदान यंत्र सिलबंद केली जातील अशी माहिती जिल्हाधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त आशिमा मित्तल यांनी दिली आहे.





मतदारांनी आपली लोकशाही सक्षम करण्यासाठी मतदानाचा दिवस हा सुट्टीचा दिवस म्हणून साजरा न करता लोकशाहीचा उत्सव म्हणून साजरा करणे आवश्यक आहे. नव मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावून, लोकशाहीच्या बळकटीकरणात सहभागी व्हावे तसेच इतरांनाही मतदान करण्यासाठी प्रेरित करावे. जालना शहरातील नागरिकांनी निर्भयपणे आपला मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त आशिमा मित्तल यांनी केले आहे.


# मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेतील अडकलेली रक्कम लवकरच मिळणार

## आमदार हिकमतदादा उढाण यांच्या थेट हस्तक्षेपामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा

**घनसावंगी । प्रतिनिधी -** घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील मागेल त्याला सौर कृषी पंप या महत्त्वाकांक्षी शासकीय योजनेअंतर्गत हजारो शेतकऱ्यांनी अर्ज करून आवश्यक ती रक्कम भरली आहे. शेतकऱ्यांना वीजेवरील अवलंबित्वातून मुक्त करून स्वयंपूर्ण करण्याच्या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत आहे. मात्र, योजनेसाठी भरलेली रक्कम अनेक शेतकऱ्यांच्या खात्यात अद्याप परत न आल्याने शेतकरी वर्गात तीव्र नाराजी निर्माण झाली होती.

सौर कृषी पंपासाठी अर्ज करताना शेतकऱ्यांनी आपापल्या क्षमतेनुसार मोठी आर्थिक गुंतवणूक केली आहे. काही शेतकऱ्यांनी कर्ज काढून तर काहींनी शेतीमाल विकून ही रक्कम भरली. परंतु अनेक महिन्यांपासून ही रक्कम अडकून राहिल्यामुळे चालू शेती हंगामात भांडवलाची कमतरता भासू लागली असून, कुटुंबाच्या दैनंदिन गरजाही भागविणे कठीण झाले होते.

या गंभीर परिस्थितीची दखल घेत आमदार हिकमत उढाण यांनी संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधत हा प्रश्न आक्रमकपणे मांडला. घनसावंगी तालुक्यातील शेतकऱ्यांची वास्तव परिस्थिती अधिकाऱ्यांसमोर स्पष्ट करत, शेतकऱ्यांचे पैसे



विनाकारण अडकवून ठेवणे हे अन्यायकारक असून तातडीने निर्णय घेणे आवश्यक असल्याची ठाम भूमिका त्यांनी घेतली.

यावेळी आमदार उढाण म्हणाले, शेतकरी हा राज्याचा कणा आहे. त्याच्या घामाच्या पैशाला विलंब होणे कोणत्याही परिस्थितीत मान्य नाही. प्रशासनाने त्वरित निर्णय घेऊन शेतकऱ्यांच्या खात्यात अडकलेली रक्कम जमा करावी.

आमदारांच्या ठाम भूमिकेमुळे प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून, मुख्य अधिकाऱ्यांकडून प्राप्त माहितीनुसार येत्या आठ ते दहा दिवसांत सौर कृषी पंप योजनेसाठी भरलेली व सध्या अडकलेली रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जाणार असल्याचे स्पष्ट आश्वासन देण्यात आले आहे.

आमदार हिकमतदादा उढाण यांच्या सक्रिय हस्तक्षेपामुळे आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा प्रश्न मार्गी लागण्याच्या दिशेने गेला असून, या निर्णयामुळे सौर कृषी पंप योजनेत सहभागी शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. प्रशासनाने दिलेल्या आश्वासनाची वेळेत अंमलबजावणी व्हावी, अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत असून, या योजनेबाबत पुन्हा एकदा विश्वासाचे वातावरण निर्माण होत असल्याचे चित्र दिसत आहे.

# संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त ECHS सुविधेचा शुभारंभ



**जालना । प्रतिनिधी -** केंद्र शासन मान्य ECHS (Ex-Servicemen Contributory Health Scheme) अंतर्गत माजी सैनिकांसाठी आरोग्यसेवा उपलब्ध करून देणाऱ्या संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल येथे आज हॉस्पिटलच्या दहाव्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून एउक्ड सुविधेचा अधिकृत शुभारंभ समारंभपूर्वक पार पडला.

या शुभप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून कॅप्टन श्री. भानुदास एकनाथराव सिरसाट साहेब उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांसाठी दर्जेदार, विश्वासार्ह व सुलभ आरोग्यसेवा उपलब्ध होणे ही अत्यंत गौरवास्पद व आनंदाची बाब असल्याचे नमूद केले.

कार्यक्रमास कॅप्टन राधाकिसन औथाडे, कॅप्टन युनूस शेख, साहेबराव डाळवे साहेब, प्रकाश दराडे साहेब, नवघरे साहेब यांच्यासह मोठ्या संख्येने माजी सैनिक उपस्थित होते. तसेच डॉ. बागल, डॉ. मिरकड, डॉ. राजगुरू, डॉ गोयल, डॉ रमेश सूर्य, अमोल कदम आदी नामांकित वैद्यकीय तज्ज्ञांची उपस्थिती लाभली. माजी सैनिक कल्याण कार्यालयाचे सानप साहेब यांनीही कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली. ECHS योजनेअंतर्गत संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये आता माजी सैनिक व त्यांच्या आश्रितांना आधुनिक वैद्यकीय सुविधा, तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला व गुणवत्तापूर्ण उपचार उपलब्ध होणार असून यामुळे जालना व परिसरातील माजी सैनिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

दीपस्तंभ रेमेडी




- वृत्तपत्रे (दैनिक, साप्ताहिक) पेज सेटींग
- वेब पोर्टल, युट्युब चॅनल
- वृत्तपत्रांचे वार्षिक विवरण
- नविन शिर्षक (वृत्तपत्र) नोंदणी ऑनलाईन अर्ज
- वृत्तपत्रांशी निगडीत सर्व प्रश्नांचे अल्पदरात उपाय

वृत्तपत्र, वेब पोर्टल नोंदणी संदर्भात संपूर्ण मार्गदर्शन
अधिस्विकृती पत्रिकेसंदर्भात संपूर्ण मार्गदर्शन
वृत्तपत्र शासनमान्य यादीत समाविष्ट करण्यासाठी मार्गदर्शन

9975387225 8390098886

# यशासाठी विद्यार्थ्यांना कठोर परिश्रमाला पर्याय नाही
## ध्येयाशिवाय जीवन म्हणजे नांगर नसलेले जहाज

**जालना । प्रतिनिधी -** तीव्र स्पर्धेच्या युगात जीवनात यश मिळवायचे असेल तर विद्यार्थ्यांना कठोर परिश्रमाशिवाय कोणताही पर्याय नाही, असे प्रतिपादन पत्रकार व शिक्षणतज्ज्ञ अहमद नूर यांनी केले.

ते शुक्रवारी जालना येथील नूतन हायस्कूलमध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित मार्गदर्शन कार्यक्रमात बोलत होते.

विद्यार्थ्यांना संबोधित करताना नूर यांनी मोबाईल फोन आणि सोशल मीडियाच्या वाढत्या व्यसनाबद्दल चिंता व्यक्त केली. एका अभ्यासानुसार, सरासरी भारतीय किमान सहा तास मोबाईल फोनवर घालवतो.अतिवापरामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता कमी झाली असून अभ्यासाकडील लक्ष विचलित होत असल्याचे त्यांनी सांगितले. तीव्र इच्छा व दृढ इच्छाशक्तीशिवाय यश मिळवणे कठीण असल्याचेही त्यांनी नमूद केले.

विद्यार्थ्यांनी आपल्या विषयांमध्ये रुची निर्माण करावी, असे आवाहन करताना त्यांनी सांगितले की, जेव्हा रुची आणि मेहनत एकत्र येतात, तेव्हा काम छंदात रूपांतरित होते आणि शिकणे आनंददायी बनते. विषयावर प्रेम करा आणि त्यात रस घ्या, मग अभ्यासाचा आनंद मिळेल, असे ते म्हणाले. अभ्यासात लक्ष व एकाग्रतेचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी लक्षपूर्वक ऐकणे, नियमित पुनरावृत्ती, सराव, टिपणे काढणे आणि शिकलेले पुन्हा आठवणे या प्रभावी अध्ययन पद्धती अंगीकारण्याचा सल्ला दिला. विषयावर चर्चा व प्रश्नोत्तरांमुळे उत्तम समज आणि दीर्घकालीन स्मरणशक्ती विकसित होते, असेही त्यांनी सांगितले. सवयींबाबत बोलताना नूर म्हणाले की, सतत केलेली कृती सवय बनते आणि मानवी जीवनातील जवळपास ९० टक्के भाग सवयींवर अवलंबून असतो. जागरूकता आणि जाणीवपूर्वक प्रयत्न केले तर वाईट सवयी सोडणे आणि चांगल्या सवयी लावणे कठीण नाही, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी स्पष्ट ध्येय ठरवावे व उद्देशहीन जीवन जगू नये, असा सल्ला देताना त्यांनी म्हटले, ध्येय नसलेले जीवन म्हणजे नांगर नसलेल्या जहाजासारखे आहे. जीवन मौल्यवान असून वेळ वाया घालवू नये, असेही त्यांनी नमूद केले. करिअर निवडताना विद्यार्थ्यांनी आपल्या प्रतिभा व आवडी ओळखाव्यात, असे आवाहन करताना नूर म्हणाले, प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही गुण व कौशल्य असते. स्वतःला विचारा की तुमच्यात कोणते गुण आहेत आणि त्यांचा विकास करण्यावर लक्ष केंद्रित करा. अडचणी किंवा दारिद्र्याची भीती बाळगू नका. त्यांनी हेलन केलर, स्टीफन हॉकिंग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची उदाहरणे देत, त्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही महान यश मिळवले, असे सांगितले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक विनायक रासवे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाला शिक्षिका मनीषा बडे आणि दस्तगीर शेख उपस्थित होते.

# ढवळेश्वरच्या सुनिता सवागे यांना ‘मा जिजाऊ गौरव पुरस्कार’ प्रदान
## २० वर्षांच्या अविरत रुग्णसेवेचा सन्मान; ढवळेश्वर परिसरात आनंदाचे वातावरण

**ढवळेश्वर । प्रतिनिधी -** रुग्णसेवा हीच खरी ईश्वरसेवा हा मंत्र जपत गेल्या दोन दशकांपासून आरोग्य क्षेत्रात निस्वार्थपणे कार्यरत असणाऱ्या ढवळेश्वर येथील सौ. सुनिता अनिल सवागे यांना 'मा जिजाऊ गौरव पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. राष्ट्रमाता जिजाऊ जयंतीच्या निमित्ताने आयोजित एका भव्य सोहळ्यात आमदार अर्जुन खोतकर, प्राध्यापक सोपानराव तेलगढ, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, गणेश सुपर कर इत्यादी मान्यवरांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**२१ वर्षांचे सेवाव्रत**

सुनिता सवागे या गेल्या २० वर्षांपासून ढवळेश्वर आणि परिसरातील गावांमध्ये आरोग्य सेवा देत आहेत. अत्यंत दुर्गम भागात किंवा प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी कुठल्याही मोठ्या आर्थिक अपेक्षेविना केवळ पोटापुरता मोबदला घेऊन सेवा दिली आहे. त्यांच्या या कामातील सातत्य आणि रुग्णप्रती असलेली आपुलकी यामुळे परिसरात त्यांना मानाचे स्थान आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने गौरवण्यात आले.



या सोहळ्याला आजी-माजी लोकप्रतिनिधी, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील दिग्गज मान्यवर तसेच मोठ्या संख्येने जिजाऊ भक्त उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी सवागे यांच्या कार्याचे कौतुक करताना म्हटले की, आजच्या काळात जिथे आरोग्य सेवा महागडी होत आहे, तिथे सवागे सारख्या महिला जिजाऊंच्या विचारांचा वारसा चालवत निस्वार्थपणे समाजाची सेवा करत आहेत, हे कौतुकास्पद आहे.

**सत्कारामुळे भावना व्यक्त**

पुरस्कार स्वीकारल्यानंतर सवागे यांनी कृतज्ञता व्यक्त केली. हा सन्मान माझा नसून मी ज्या रुग्णांची सेवा केली, त्यांच्या प्रेमाचा आहे. या पुरस्कारामुळे मला भविष्यात अधिक जोमाने काम करण्याची ऊर्जा मिळाली आहे, अशा भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.या निवडीबद्दल ढवळेश्वर ग्रामस्थांनी आणि आरोग्य क्षेत्रातील सहकाऱ्यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

### खतवड येथे राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर संपन्न
# शिबिर सामाजिक जाणीव निर्माण करणारी प्रभावी चळवळ-संचालक जाधव

**दिंडोरी । प्रतिनिधी -** शाश्वत विकासासाठी युवकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असून, राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करणारी प्रभावी चळवळ आहे असे प्रतिपादन मराठा विद्या प्रसारक समाज संचालक प्रविण जाधव यांनी केले.

दिंडोरी तालुक्यातील खतवड येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व मराठा विद्या प्रसारक समाज यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, दिंडोरी यांच्या वतीने शाश्वत विकासासाठी युवक; पाणलोट आणि जमीन व्यवस्थापन या संकल्पनेवर आधारित राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सदर शिबिर समारोप प्रसंगी अध्यक्षीय भाषणात संस्थेचे संचालक प्रविण जाधव बोलत होते.

शिबिराच्या कालावधीत महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी खतवड गावांतर्गत विविध उपक्रम राबविले. यामध्ये गावातील रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात आली असून, लावण्यात आलेल्या रोपांच्या संवर्धनाच्या दृष्टीने संरक्षक जाळ्या बसविण्यात आल्या.व त्याच प्रमाणे, स्वच्छता अभियान, जनजागृती रॅली, वनराई बंधारा,यामुळे पर्यावरण संरक्षणासोबतच पाणलोट व जमीन व्यवस्थापनाचे महत्त्व प्रत्यक्ष कृतीतून अधोरेखित झाले.

या शिबिरातून युवकांमध्ये शाश्वत विकासाची जाणीव निर्माण करण्याबरोबरच पर्यावरण संवर्धन, नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन व ग्राम विकासात युवकांची भूमिका याबाबत जनजागृती करण्यात आली. श्रमसंस्कार, स्वच्छता, वृक्षसंवर्धन यांसारख्या उपक्रमांमुळे गावकऱ्यांमध्येही सकारात्मक प्रतिसाद दिसून आला.

शिबिराच्या समारोपप्रसंगी बोलताना संचालक पर्वीण जाधव यांनी युवकांनी समाजासाठी केलेल्या कार्याचे कौतुक केले.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालय प्राचार्य डॉ.व्ही.बी.कदम यांच्या मार्गदर्शनाखाली,उप प्राचार्य रविन्द्र झोमान, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी, महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग, स्वयंसेवक विद्यार्थी तसेच खतवड ग्रामस्थ यांनी मोलाचे सहकार्य केले. सदर उपक्रमामुळे ‘सेवेविना शिक्षण अपूर्ण’ ही राष्ट्रीय सेवा योजनेची संकल्पना प्रत्यक्षात उतरल्याचे चित्र दिसून आले.



यावेळी व्यासपीठावर सरपंच बबन दोबाडे, उपसरपंच सुकदेव खुर्दळ,प्राचार्य डॉ. व्हि.बी. कदम, ग्राम पंचायत सदस्य सरला मांदळे सविता खुर्दळ, ग्राम पंचायत अधिकारी श्रीमती आर एच काथेपुरी, जेष्ठ सभासद निवृत्ती मुळाणे,भास्कर खुर्दळ, त्रंबक जाधव, सुकदेव खुर्दळ, पोपट मुळाणे, दशरथ मुळाणे, प्रकाश खुर्दळ, निवृत्ती माळेकर आदीसह महाविद्यालयीन शिक्षक वृंद व मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. धनंजय लोंढे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रियंका कड, प्रा. शुभम वाघ, समन्वयक भगत, सकाळ सत्र प्रमुख प्रा. गौरव सोमवंशी, बाजीराव चौधरी, समीर चौधरी, ग्राम पंचायत कर्मचारी विनोद जाधव,बाळू गवे,दौलत दोबाडे आदीसह शिक्षक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# लोकशाहीच्या मजबुतीसाठी प्रत्येकाने कर्तव्य भावनेने मतदान करावे-जावेद बावला

**जालना । प्रतिनिधी** - लोकशाही ही केवळ जनतेच्या सहभागावर उभी असलेली शक्ती आहे. ही शक्ती बळकट करायची असेल, तर प्रत्येक नागरिकाने कर्तव्यभावनेने मतदान करणे अत्यावश्यक आहे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते तथा प्रगतशील शेतकरी जावेद अब्दुल कादर बावला यांनी केले आहे.



जावेद बावला म्हणाले की, निवडणूक म्हणजे केवळ उमेदवारांची स्पर्धा नसून, ती आपल्या हक्कांची, आपल्या भविष्याची आणि आपल्या शहराच्या दिशेची निवड आहे. मतदान न करणे म्हणजे आपल्या निर्णयाचा अधिकार स्वेच्छेने सोडून देणे होय. शेतकरी, कामगार, युवक, महिला आणि सामान्य नागरिक या सगळ्यांच्या प्रश्नांवर निर्णय घेणारे प्रतिनिधी निवडून देण्याची ताकद मतपेटीत आहे. ही ताकद वापरली नाही, तर लोकशाही केवळ नावापुरती उरेल, असे ते म्हणाले. विशेषतः तरुणांनी ‘माझ्या एका मताने काय फरक पडणार’ ही मानसिकता सोडून देऊन मतदान प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा. लोकशाहीच्या मजबुतीसाठी, पारदर्शक आणि उत्तरदायी शासनासाठी प्रत्येकाने मतदान हे आपले सामाजिक कर्तव्य मानून बजावावे, असे आवाहन जावेद बावला यांनी केले आहे.

# देवगिरी नागरी सहकारी पतसंस्थेचा वर्धापन सोहळा संपन्न



**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील रामनगर शाखेचा २ रा वर्धापन दिन भारत माता,राष्ट्रमाता जिजाऊ,स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन संस्थेचे सभासद सतीश टकले,दैनिक जगमित्रचे व्यवस्थापक भगवान भुतेकर,गणेशजी मोठे व सर्व बँकेचे कर्मचारी यांच्या हस्ते साजरा करण्यात आला.यावेळी संस्थेचे सल्लागार सभासद व कर्मचारी उपस्थित होते.संस्थेचे अध्यक्ष परेशभाऊ बागवे यांनी संस्थेला भेट देऊन, पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# कर्मचारी परिषद बँक जिल्हा उपाध्यक्षपदी रवींद्र बावीस्कर

**दिंडोरी । प्रतिनिधी -** राज्य सरकारी कर्मचारी परिषद बँकेच्या नाशिक जिल्हा उपाध्यक्षपदी दिंडोरी येथील बांधकाम शाखा अभियंता रवींद्र बावीस्कर यांची निवड झाली आहे. रवींद्र बावीस्कर गेल्या अने वर्षांपासून दिंडोरी पंचायत समिती येथे बांधकाम विभागात शाखा अभियंता म्हणून कार्यरत आहे. त्यांच्या कर्मचारी वर्गांमध्ये त्यांची प्रतीमा अतिशय चोख असून तसेच अडचणीच्या काळात सर्वांसाठी धावून मदत करीत असतात. त्यामुळे कर्मचारी वर्गांमध्ये त्यांना सहानुभूती आहे. त्यांची जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल कर्मचारी वर्गांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. रवींद्र बावीस्कर यांच्या निवडीबद्दल दिंडोरी पंचायत समिती बांधकाम विभागाचे उप अभियंता नितीन चौधरी सहाय्यक अभियंता चेतन गवळी शाखा अभियंता श्याम कुमार सोनवणे योगेश खांबोरे राहुल मोरे श्रीमती स्नेहल गांगुर्डे नामदेव भोये भागवत जाधव श्रीमती वनिता तांबट हर्षल खैरनार आदित्य अहिरराव कुणाल ढिकले प्रतीक मोरे , आदींनी अभिनंदन केले.



# जोपुळ येथील साखळी उपोषणास राज्यमंत्री डॉ.भारतीताई पवार यांची भेट



**दिंडोरी । प्रतिनिधी -** दिंडोरी तालुक्यातील जोपुळ येथे गेल्या काही दिवसांपासून राज्य क्र.२९ वरील बाधित शेतकरी कृती समितीचे झथऊ च्या अन्यायकारक कार्यवाहीच्या विरोधात सुरु असलेल्या साखळी उपोषणास मा.केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ.भारतीताई पवार यांनी आज दि.१३ रोजी भेट देऊन उपस्थित शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या,सिहंस्थ कुंभमेळा २०२७ करिता पिंपळगाव (मार्केट), जोपूळ,लोखंडेवाडी,पालखेड,दिंडोरी रामा क्र.२९ किमी रस्ता ८५/३०० ते १०३/७०० मंजूर आहेत.सदर रस्ता राज्यमार्ग दर्जाचा असून कोणतेही भुसंपादन न करता झथऊने रस्त्याचे काम सुरु केले असून बाधित शेतकऱ्यांच्या जमिनीचे अधिकृत भू संपादन करून भरपाई देण्यात यावी, ही शेतकऱ्यांची प्रमुख मागणी असून शेतकऱ्यांना जमिनीचा योग्य मोबदला मिळाल्यास रस्त्याच्या रुंदीकरणास कोणताही विरोध नसल्याचे मा.मंत्री महोदय भारतीताई पवार यांनी जाणून घेतले,मी शेतकऱ्यांसोबतच असून १६ तारखेनंतर कुंभमेळा मंत्री तथा पालकमंत्री गिरीश महाजन साहेब यांचे सोबत शेतकऱ्यांची तसेच झथऊ चे संबंधित अधिकारी यांचे सोबत संयुक्त बैठक आयोजित करणार असल्याचे सांगितले.उपोषण स्थळी जोपूळ,चिंचखेड,लोखंडेवाडी, धामणवाडी,पालखेड येथील शेतकरी तसेच भाजपा तालुकाध्यक्ष शाम मुरकुटे अमोल खोडे,किशोर ढगे,शांताराम वाघ,भगवान उगले व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.